# विषय : मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास: प्रारंभ ते इ.स.१६००

## [DSE 1 C (3+1)]

## घटक २) – ३. महानुभाव वाङ्मय

### महानुभाव वाङ्मयातील गद्य ग्रंथ

### लीळाचरित्र :

मराठीतील पहिला चरित्रग्रंथ म्हणून 'लीळाचरित्रा'चे महत्त्व अनन्यसाधारण आहे. महानुभाव संप्रदायाचे संस्थापक **श्रीचक्रधरस्वामी यांच्या लीळा (आठवणी) त्यांच्या शिष्याने म्हणजे म्हाइंभट्टाने संकलित** करून चित्ररूपाने मांडल्या. मूळचा अत्यंत गर्भश्रीमंत आणि विद्वान असणाऱ्या म्हाइंभट्टाला आपल्या विद्वत्तेचा अतीव गर्व होता. आपण इतरांना तृणासमान लेखतो याचे चिन्ह म्हणून तो पायात गवताची वाकी घाली. आकाशात एक सूर्य आणि पृथ्वीवरील मी 'अपरसूर्य' असे तो स्वतःस म्हणवी. पुढे चक्रधरांच्या सहवासात आल्यानंतर मात्र त्याचा अहंकार गळाला आणि तो त्यांचा एकनिष्ठ शिष्य बनला. चक्रधरांच्या प्रयानानंतर सर्व शिष्य ऋद्धिपूरास एकत्र आले असता, आपल्या परमप्रिय गुरूच्या लीळांचे स्मरण त्यांना होणे अत्यंत स्वाभाविक होते. याच वेळी म्हाइंभट्टास लीळाचरित्राची कल्पना सुचली असावी.

म्हाइंभट्टांनी वेगवेगळया ठिकाणी जाऊन चक्रधरांच्या सहवासात राहिलेल्या पंथीयांकडून लीळा गोळा करून आणाव्यात आणि नागदेवाचार्यांकडून त्यांचा खरेपणा पारखून त्यांच्या परवानगीने संकलित कराव्यात अशा संकलन-संशोधन पद्धतीने हे चरित्र लेखन झाले आहे. सत्यनिष्ठेच्या कसोटीमुळे त्यात विश्वसनीयता आली आहे. आपल्या गुरुचे हे चरित्र एक प्रमाणग्रंथ होण्यासाठी मराठीतील या आद्य चरित्रकाराने घेतलेले हे परिश्रम खरोखरच कौतुकास्पद आहेत. एकदा खेइंभटाकडे  लीळा मिळविण्यास ते गेले तेव्हा, 'खेइंभट कृषिकर्म करिति : आणि म्हाइंभट्ट तया मागां मागां गोसावियांचीया लीळा पुसति : खेइंभट सांघाति :  त्या म्हाइंभट्ट नमस्करूनि घेति:' अशी आठवण सांगितली जाते. म्हाइंभट्टांची आपल्या गुरूबद्दलची निष्ठा आणि गुरूच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष सांगणारी प्रत्येक लीळा गोळा करण्यामागील त्यांची चिकाटी या उद्गारांतून स्पष्ट होते.

लीळाचरित्राची विभागणी एकाक, पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा तीन विभागांत असून एकूण लीळांची संख्या १५०९ इतकी आहे. पूर्वार्धात आणि उत्तरार्धात असलेल्या चक्रधरांच्या लीळा सांगणारी अनेक शिष्यमंडळी संप्रदायात होती. कारण या लीळा त्यांच्यासमोरच घडलेल्या होत्या. पण एकाकी अवस्थेतील चक्रधरांचे जीवन फारसे कुणाला माहीत नव्हते. महदायिसेसारख्या जिज्ञासू शिष्येशी चर्चा करताना किंवा काही भक्तांशी बोलताना चक्रधरांच्या मुखातून पूर्वायुष्यातील काही संदर्भ सहजपणे येऊन जात. स्वामींच्या मुखातून ऐकलेल्या अशा काही संदर्भांचा-प्रसंगांचा आधार घेऊन त्यांच्या पूर्वजीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न 'एकाका'त झाला आहे.

चक्रधर आणि महानुभाव संप्रदाय यांच्याविषयीची वैविध्यपूर्ण माहिती 'लीळाचरित्रातून प्रकट झाली आहे. चक्रधर हे महानुभावांचे चैतन्यशील असे प्रेरणास्थान होते. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा तो मूलस्रोत होता. चक्रधरांच्या निमित्ताने अनेक व्यक्तींची आणि स्थळांची माहिती, तत्कालीन राजकीय, सामाजिक व धार्मिक जीवनातील अनेकविध वैशिष्ट्ये लीळाचरित्रातून घडत असल्यामुळे या ग्रंथाला सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

चक्रधर दिसायला सुंदर होते. अवतारित्वामुळे या सौंदर्याला आगळी झळाळी प्राप्त झाली होती. चक्रधरांना पाहिल्याबरोबर 'अया : कैसे सौंदर पुरुषु : साक्षात गोरक्षनाथु' असे उद्गार जोग-जोगिणींच्या मुखातून बाहेर पडत. सशाचा पाठलाग करीत आलेल्या पारध्यांना सांगून सशाला अभय देणारे चक्रधर ; लोणारला जात असता वाटेत भेटलेल्या चोरांना 'महात्मे' असे संबोधून त्यांची कुमती हरण करणारे चक्रधर ; लहानग्या धानाईला साळू - कावळ्याची गोष्ट सांगणारे चक्रधर ; ब्राह्मणाच्या घरची गुरे राखणारे चक्रधर ; महदायिसेसारखे वृद्ध शिष्येला श्रमाने थकवा येतो म्हणून तिचे अंग चुरणारे चक्रधर ; ऋद्धिपुर दिसताच 'हे घेया परमेश्वरपूर : करा नमस्कारू' म्हणून दंडवत घालणारे आणि श्रीप्रभूंच्या चरणांची धूळ मस्तकी धारण करणारे चक्रधर ; अशी श्रीचक्रधर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेकविध रूपे म्हाइंभट्ट यांनी भेदकपणे अक्षरबद्ध केले आहेत.

रसपूर्ण निवेदन आणि भाषेचा साधेपणा या गुणविशेषांनी लीळाचरित्राचे सौंदर्य वाढले आहे. छोटी छोटी वाक्ये, घरगुती स्वभावाची साधी, सोपी व अनौपचारीक भाषा, वाकप्रचार यांच्याद्वारे लीळाचरित्रातून तेराव्या शतकातील मराठी समाजाचे आणि सांस्कृतिक जीवनाचे अंतरंग उलगडले आहे. अल्पक्षररमणीयत्व हे म्हाइंभट्टांच्या निवेदनशैलीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य हे या ग्रंथाचे सामर्थ्य आहे.

## स्मृतिस्थळ :

लीळाचरित्राप्रमाणे हाही एक चरित्रग्रंथच आहे. चक्रधरानंतर या पंथाचे नेतृत्व नागदेवाचार्यांकडे आले. स्मृतिस्थळात नागदेवाचार्य यांच्या 'स्मृती' संग्रहित केल्या आहेत. महानुभव संप्रदायात चक्रधरांच्या वचनांवर श्रुती म्हणतात आणि भटोबास उर्फ नागदेवाचार्यांच्या वचनांना 'स्मृती' असे संबोधतात. स्मृतिस्थळात एकूण २६१ स्मृती संग्रहित केल्या आहेत. या ग्रंथाची रचना नागदेवाचार्यांच्या मृत्यूनंतर झाली आहे. लक्ष्मीधरभट, केसोबास, म्हाइंभट यांना ग्रंथलेखनाची प्रेरणा दिली ती भटोबासांनीच. संस्कृतात प्रश्न करणाऱ्या केसोबासांना ----

'पंडिता : केशवदेया : तुमचा अस्मात् कस्मात् मी नेणे गा : मज श्रीचक्रधरे निरुपली मऱ्हाटीं : तियांचि पुसा :'

अशा शब्दांत त्यांनी खडसावले होते. त्यातून त्यांचा मराठीविषयीचा अभिमान प्रकट होतो.

चक्रधरांच्या निर्वाणानंतर नगदेवाचार्यांची अवस्था मोठी विचित्र झाली. चक्रधरांनी भिंतीच्या चिरेवर टाकलेली पिचकारी पाहून अनावर शोकावेगाने ती चिरेवरील पिचकारीच जीभ खरडेपर्यंत चाटणाऱ्या नागदेवाचार्यांचे रेखाटलेले व्यक्तिचित्र अत्यंत अपूर्व असे आहे. भानुभटास 'दाताने सुपारी फोड' असे नागदेवाचार्यांनी सांगितले. पण 'भटो दाते कैसे फोडू ? उसिटे होईल' असे तो उत्तरला. या प्रसंगी 'सेवेची उसीटा भावो नाही' असे मार्मिक उत्तर नागदेवाचार्यांनी दिले आहे. अत्यंत निरंकारी असणारा हा शिष्य तितकाच व्यवहारी आणि कर्तुत्ववानही होता. चक्रधरानंतर एवढी मोठी व्यक्ती महानुभवांमध्ये दुसरी झाली नाही. 'गोसावियांचा व्यापारू चालविता, कोणा

माझे वेकास गेले असैल तरि तुम्ही समस्ती क्षेमा करावी' हे अंत्यसमयीचे त्यांचे उद्गार मनाला चटका लावून जातात. अत्यंत साधे आणि मोजक्या शब्दातून तत्कालीन राजकीय, सामाजिक, साहित्यविषयक, धार्मिक आणि भौगोलिक परिस्थितीचे चित्र 'स्मृतीस्थळा'तून साकार झाले आहे.

'स्मृतिस्थळा'चा लेखक कुणी एक व्यक्ती नसून अनेकांच्या पाठांचे हे संकलन आहे. तरी पण नरेंद्र व परशराम हे मूळ लेखक आणि मालोबास व गुर्जर शिवबास हे 'स्मृतिस्थळा'चे संस्करणकार असल्याचे सांगतात.

### दृष्टान्तपाठ :

आपले तत्त्वज्ञान सर्वसामान्य सुलभ करून सांगण्यासाठी चक्रधर अनेक दृष्टान्त देत. हे दृष्टान्त लोकजीवनातून निवडलेले असतात. या दृष्टान्ताचे संकलन केसोबासांनी केलेले आहे. यात एकूण ११४ दृष्टान्तांचे संपादन झाले आहे. हे दृष्टान्त म्हणजे उपदेशपर कथाच म्हणावयास हरकत नाही.

केसोबासांनी चक्रधरांची सूत्रे व दृष्टान्त निवडले. प्रत्येक दृष्टान्ताचे तीन भाग पडतात. प्रथम चक्रधरांनी सांगितलेले सूत्र, नंतर त्या सूत्रातला विचार किंवा तत्त्व पटवणारा दृष्टान्त, आणि शेवटी त्या दृष्टान्तातून त्या सूत्राशी सुसंगत असे काढलेले पारमार्थिक निष्कर्ष, म्हणजे दार्ष्टांतिक. 'दृष्टान्तपाठा'तील सूत्रे व दृष्टान्त चक्रधरांचे, आणि दार्ष्टांतिक केसोबासांची आहेत. उदा.

**सूत्र** : राजसा तामसा धर्मी अधिकार नाही.

**दृष्टान्त** : सेंवाळले खडक असें : तयावरि पावो देउंची
तथा ठेउंचि नए। ऐसांही ठेवीजे तरि नीरसौनि पाडी :
गुडघे कोपर झांजरीती ॥

**दार्ष्टांतिक** : तैसे तामसाप्रति धर्म बोलोचि नए
ऐसांही बोलीजे तरि दु:खातेचि दे ॥

समर्पक आणि मनाला भिडतील असे दृष्टान्त आणि मार्मिक शब्दयोजना यामुळे सूत्रातील उपदेश सामान्यांना समजेल असा झाला आहे. चक्रधरांची जिवंत वाणी आणि केसोबासांची सुसंस्कारित भाषासरणी यांचा संयोग आपणास दृष्टान्तपाठात आढळतो.

## महानुभाव वाङ्मयातील पद्य ग्रंथ :

### महदंबेचे धवळे :

महानुभाव पंथीयात आद्य मराठी कवयित्री म्हणून महंदबा यांचा उल्लेख होतो. त्यांचे मूळचे नाव रुपाई. महदंबा हे चक्रधरांनी तिच्या विदुषी पणजी वरून ठेवलेले नाव होय. बालपणी तिचा विवाह झाला. पुढे वैधव्य आल्यानंतर ती चक्रधरांच्या सहवासात आली. त्यांची शिष्य बनली. चक्रधरांच्या अनुज्ञेने ती काही काळ ऋद्धिपूर येथे गोविंदप्रभूपांशी राहिली होती. तिथेच तिने धवळयांचा पूर्वार्ध रचला. महदंबेचे उत्तरायुष्य सत्पुरुषांच्या सेवेत आणि तीर्थयात्रेत व्यतीत झाले.

महंदबा यांचे व्यक्तिमत्त्व कलासंपन्न असे होते. त्या स्पष्टोक्ती असूनही पंथातील लोकांवर त्यांचा चांगला वचक होता. केसोबास एकदा दुपारी झोपला असता तिने त्यांची चांगलीच कानउघडणी केली होती. चक्रधरांनी -
'म्हातारी जिज्ञासक : म्हातारी चर्चक म्हातारी एथ काही पूसतचि असे' अशी तिची स्तुती केली आहे.

**धवळे पूर्वार्ध**

धवळे म्हणजे लग्नात गावयाचे वरविषयक गीत. महंदबेने इ.स.१२८७ पूर्वी केव्हातरी हे धवळे लिहिले असावेत. एक दिवस भिक्षेत जात असता रस्त्यात तिला भाशिंग घेऊन जाणारी एक तेलीण दिसली. महंदबेने गोविंदप्रभू यांच्यासाठी एक भाशिंग मागितले. व ते आणून गोसावियांचीया श्रीमुगुटी बांधले. काकंण बांधले. तुरे वाजविले. महंदबा या वेळी गाऊ लागली. धवळयांच्या निर्मितीची कथा ही अशी आहे. या वेळी फक्त पूर्वार्ध लिहिला असून त्यात ८३ धवळे आहेत.

**धवळे उत्तरार्ध**

धवळयांच्या उत्तरार्धाचे कर्तृत्व मात्र पूर्णत: महंदबेकडे जात नाही. महंदबा, म्हाइंभट्ट व लक्ष्मींद्रभट या तिघांकडे धवळयांच्या उत्तरार्धाचे कर्तृत्व जाते. उत्तरार्धातील धवळयांची संख्या ६३ असून त्यांचे लेखनकाल इ.स. १३०८ पूर्वीचा संपवतो.

धवळयांच्या पूर्वार्धात रुक्मिणीहरणाचा कथाभाग आला असून उत्तरार्धात रुक्मिणीस्वयंवराचे निवेदन आहे. धवळयांत प्रारंभीच सर्वेश्वराला नमन केले असून लगेच रुक्मिणीहरणाची कथा सांगितली आहे. रुक्मिणीने कृष्णास लिहिलेल्या पत्रिकेचा मात्र यात कुठेच उल्लेख नाही. विप्राचा निरोप, कृष्णागमन, अंबिकापुरात त्याचे वास्तव्य आणि अंबिकेच्या दर्शनास आलेल्या रुक्मिणीचे हरण इत्यादी प्रसंग भागवतातील आहेत. कृष्णाला पाहिल्यानंतर रुक्मिणीची झालेली अवस्था महदंबेने परिणामकारकरीत्या वर्णन केले आहे.

कृष्णाचे रुक्मिणीसह द्वारकेस आगमन, नगरप्रवेश इत्यादी प्रसंग स्वाभाविक असे वाटतात. तेराव्या शतकातील विवाहपद्धतीची माहितीही धवळयांतून मिळते. स्वाभाविकता, गतिमानता, सहजसुंदरता आणि स्त्रीसुलभता हे धवळयांचे उठून दिसणारे अस विशेष आहेत.

## महानुभाव वाङ्मयातील साती ग्रंथ

महानुभाव पंथीयांच्या सात महत्त्वपूर्ण पद्यग्रंथांचा समूह 'साती ग्रंथ' म्हणून ओळखला जातो. हे सारे ग्रंथ ओवीबद्ध आहेत. ह्या साती ग्रंथांत पुढील ग्रंथांचा अंतर्भाव होतो :

(१) नरेंद्र - रुक्मिणीस्वयंवर (१२९२),

(२) भास्करभट्ट बोरीकर - शिशुपालवध (१३१२)

(३) भास्करभट्ट बोरीकर - उद्धवगीता (१३१३),

(४) दामोदर पंडित - वछाहरण (सु.१३१६)

(५) रवळोबास किंवा रवळोव्यास - सैह्याद्रिवर्णन (१३५३)

(६) पंडित विश्वनाथ बाळापूरकर उर्फ विश्वनाथ बास - ज्ञानप्रबोध (सु. १४१३ वा १४१८)

(७) पंडित नारायण व्यास बहाळिये - ऋद्धिपूरवर्णन (सु. १४१३ वा १४१८)

**(१) नरेंद्र कृत रुक्मिणीस्वयंवर :**

नरेंद्रांच्या रुक्मिणीस्वयंवरास साती ग्रंथांत आद्यस्थान देण्यात आलेले आहे. उत्कट कृष्णभक्तीतून लिहिलेले हे काव्य मराठीतील पहिले शृंगारपर व आख्यानक काव्य म्हणता येईल. ते लिहिताना संस्कृत महाकाव्यांचा आदर्श नरेंद्रांच्या समोर होता, असेही जाणवते.

नरेंद्र हा रामदेवराव यादव यांच्या दरबारातील कवी. याच्या दोन बंधूंनी (साल कवी व नृसिंह कवी यांनी) अनुक्रमे रामायण व नलोपाख्यान लिहिलेले पाहून श्रीकृष्णभक्त असलेल्या नरेंद्राने त्यांची निर्भर्त्सना केली. दोघाही बंधूंनी नरेंद्रास श्रीकृष्ण कथेवर काव्यलेखन करण्याचे आवाहन केले. या आवाहनातून **१८०० ओव्यांच्या** 'रूक्मिणीस्वयंवरा'चा जन्म झाला. हे काव्य रामदेवरावाला इतके आवडले की हा ग्रंथ आपल्या नावावर केल्यास आपण तुला प्रत्येक ओवीस सोनटक्का देऊ, असे सांगितले. 'असे केल्यास आमच्या कविकुलास कलंक लागेल; असे स्पष्ट उत्तर देऊन स्वाभिमानी नरेंद्र परतला. एका रात्रीत होईल तेवढा ग्रंथ नकलून तो भटोबासापाशी आला व त्याने महानुभाव पंथाची दीक्षा घेतली.

**(२) भास्करभट्ट बोरीकररचित शिशुपालवध :**

महानुभाव पंथाचा तिचा आचार्य म्हणजे भास्करभट्ट बोरीकर. पंथनिष्ठा, प्रज्ञा आणि प्रतिभा यांचा मिलाप त्याच्याठायी असल्याचे सांगितले गेले आहे. वेदान्तापासून शृंगारापर्यंत विविध शास्त्रात त्याची गती होती. शिशुपालवध हा त्याचा काव्य दृष्ट्या सरस ग्रंथ इ.स.१३१३ मध्ये लिहिला गेला. १०८७ ओव्यांच्या या काव्यात शिशुपालवध वर्णनासाठी फक्त शंभरच ओव्या वापरून उरलेल्या सर्व ओव्या फक्त श्रीकृष्ण व रूक्मिणी यांच्या विरह आणि प्रणयवर्णनात खर्ची पडले आहेत.

भास्करभट्ट बोरीकरांच्या शिशुपालवधाचा विषय वीररसानुकूल असला, तरी त्यात वीररसापेक्षा शृंगाररसाला अधिक महत्त्व मिळाल्याचे दिसून येते. शिशुपालवधातून महानुभावीय तत्त्वदर्शनापेक्षा पांडित्य, रसिकता आणि आत्यंतिक शृंगारसक्ती यांचे दर्शन अधिक घडते. त्यामुळे 'ग्रंथु निका जाला असे : परि निवृत्ता जोगा नव्हेचि : हा शृंगारिया प्रवृत्ताजोगा झाला असे :' असे परखड उद्गार बाईदेवव्यासांनी काढले.

**३) भास्करभट्ट बोरीकररचित उद्धवगीता :**

'शिशुपालवध' हा ग्रंथ 'निवृत्ता जोगा नव्हेचि' असा बाईदेवव्यासांनी अभिप्राय दिल्यावर पूर्णपणे निवृत्तिपर ग्रंथ लिहिण्याचे भास्करभट्ट बोरीकरांनी ठरवले. त्यातून 'उद्धवगीते'चा जन्म झाला. व्यासांनी रचलेल्या भागवताच्या एकादशस्कंधावर भास्करभट्ट बोरीकरांनी ही मराठी टीका लिहिली. त्यांची उद्धवगीता ही भागवताच्या एकादशस्कंधावरील पहिली मराठी टीका होय. एकादशस्कंधावरील मराठीतील हे पहिले भाष्य असून या स्कंधात श्रीकृष्णाने उद्धवास केलेला उपदेश भास्करभट्ट बोरीकरांनी ८२७ ओव्यात सांगितलेला आहे. उद्धवगीता पाहून

बाईदेवव्यासांनी त्यांचे कौतुक केले. "आता हो ए कवीस्वर हो : हा आता निवृत्ताजोगा जाला : ऐसे म्हणोनि थोर तोखले" असे म्हटले.

**४) दामोदर पंडितांचे वछाहरण :**

दामोदर पंडितांनी वछाहरणाची रचना इ.स.१३१६ मध्ये केली. भागवताच्या दशमस्कंधातील १२, १३ व १४ व्या अध्यायात अघासुरवधाची व वत्सहरणाची कथा आली आहे. त्या कथेच्या आधारे दामोदरपंडितांनी हे ५०३ ओव्यांचे काव्य लिहिले.

**५) पंडित विश्वनाथ बाळापूरकर यांचे ज्ञानप्रबोधन :**

पंडित विश्वनाथ बाळापूरकर यांनी 'ज्ञानप्रबोध' हे १२०४ ओव्यांचे काव्य इ.स.१२३१ मध्ये लिहिले आहे. गीतेतील तेराव्या अध्यायामधील ज्ञानलक्षणे सांगणाऱ्या श्लोकांवरील हे भाष्य आहे. या ग्रंथात पंथप्रवर्तकांचे म्हणजेच श्रीचक्रधरांचे अत्यादरपूर्वक वर्णन कवीने केले आहे.

विश्वनाथ बासांच्या ज्ञानप्रबोधात महानुभाव तत्त्वज्ञानाचे प्रतिपादन आहे. त्यांचे उद्दिष्ट श्रीचक्धरोक्त मोक्षमार्गाचे निरूपण करणे, हे असून ज्ञान हा या मोक्षमंदिराचा पाया, वैराग्य हा त्यावर बांधलेला प्रासाद आणि भक्ती हा त्यावरील कळस होय, अशी कवीची भूमिका आहे. त्यात सांगितलेली ज्ञानलक्षणे गीतेच्या तेराव्या अध्यायातील ७ ते ११ ह्या पाच श्लोकांच्या आधारे सांगितलेली आहेत. तसेच अज्ञानलक्षणेही 'अज्ञानं यदतोऽन्यथा' या गीतावचनाला (१३.११) अनुसरूनच यात आली आहेत. त्यामुळेच ज्ञानप्रबोध ही गीतेवरील टीका होय, असा समज रूढ झाला असावा. तथापि ज्ञानप्रबोधा चा गीताश्रित भाग (ओ. ६१ ते २१५) ज्ञानेश्वरीचीही पदोपदी आठवण करून देतो. विश्वनाथ बासांकडे काव्यदृष्टीही असल्यामुळे ह्या ग्रंथाला काव्यसौंदर्यही लाभले आहे.

**६) रवळोव्यास उर्फ राधापाध्याय पाथरीकर यांचे सह्याद्रीवर्णन :**

पंथीय उपासकांच्या भूमिकेतून रवळोव्यास उर्फ राधापाध्याय पाथरीकर यांनी इ.स.१३३३ मध्ये 'सह्याद्रीवर्णन' लिहिले. महानुभावांनी श्रीकृष्णाप्रमाणेच श्रीदत्तात्रयेला पूर्णावतार मानले आहे. श्रीदत्तात्रेयाचे स्तोत्र असेच जवळजवळ या ग्रंथाचे स्वरूप आहे. ५१७ ओव्यांच्या या काव्यात श्रीदत्तात्रेयाचे चरित्र मात्र फक्त १६० ओव्यांत आले आहे. त्यातही १०५ ओव्यांत श्रीदत्तात्रेयाचे मूर्तिवर्णन असून शेवटच्या ५५ ओव्यांत दत्तचरित्र आले आहे. यातला उरलेला बरसा भाग श्रीचक्रधर चरित्राने व्यापलेला आहे. मूळ काव्याचा हेतू 'बोलैन श्री दत्ताची चरित्रे' असा आहे, दत्तचरित्राच्या वाट्याला १८१ ओव्या दिल्या असून उर्वरित भाग श्रीचकधरांचे अवतार कार्य व त्याच्या अनुषंगाने कवीचे आत्मनिवेदन यांनी व्यापला आहे. ह्या काव्यातून वर्णिलेले श्रीदत्तात्रय एकमुखी आहेत. तसेच येथे सह्याद्री म्हणजे माहूरचा (मातापूरचा) डोंगर आहे. ह्या डोंगराला एके काळी सह्य असे नाव होते. कवीच्या उत्कट भक्तिभावनेची प्रचिती ह्या काव्यातून येते.

**७) पंडित नारायण व्यास बहाळिये ह्यांचे ऋद्धिपूरवर्णन :**

पंडित नारायण व्यास बहाळिये ह्यांच्या ऋद्धिपूरवर्णन (ओव्या ६४१) या ग्रंथात महानुभावांच्या पंचकृष्णांपैकी एक असलेले श्रीगोविंदप्रभू ह्यांचे अवतारकार्य जेथे झाले, त्या ऋद्धिपुराचे अत्यंत सहृदयतेने आणि भक्तिभावाने वर्णन

केले आहे. ऋद्धिपूर हे महानुभावीयांचे पवित्र क्षेत्र असल्यामुळे त्या विषयावर दहा-बारा लहानमोठे ग्रंथ निर्माण झाले; तथापि त्यांतही ऋद्धिपूरवर्णन हे काव्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. शिवाय या काव्याचा आणखी एक विशेष म्हणजे त्याच्या सर्वांगातून खेळविलेले श्रीप्रभुचरित्र होय. ही दोन इतकी एकरूप आहेत की, ती एकमेकांपासून वेगळी करताच येत नाहीत. कविमनात वसत असलेल्या या ऐक्यभावाचा आविष्कार सर्व काव्यभर झालेला दिसून येतो. या काव्याचा अंतर्भाव साती ग्रंथांत करून महानुभाव पंथाने त्याला अधिकृत मान्यता दिली आहे.

**थोडक्यात :**

हे साती ग्रंथ सु.सव्वाशे वर्षांच्या कालावधीत तयार झाले आहेत. ह्या सात ग्रंथांचा एक समूह मानताना विशेष असे कोणतेही निकष लावलेले दिसत नाहीत; तथापि एक विशेष लक्षवेधी बाब म्हणजे नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवराची भाषा आणि त्यानंतर शंभरांहून अधिक वर्षांनी लिहिलेल्या ज्ञानप्रबोध व ऋद्धिपूरवर्णन ह्या ग्रंथांची भाषा या दोहींत भाषाशास्त्रदृष्ट्या साधर्म्य आहे. तसेच महानुभाव होण्यापूर्वीचे नरेंद्राचे रुक्मिणीस्वयंवर सोडले, तर पंथनिष्ठा आणि चक्रधरभक्ती ह्यांच्या पक्क्या धाग्यांनी त्यांना जोडलेले आहे.

----------------------------------------------------------------------------------------------------